# प्रकरण पहिले

# अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांचे साहित्य व त्यांच्या साहित्य लेखनामागील प्रेरणा

## प्रकरण पहिले

## अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांचे साहित्य व त्यांच्या साहित्य लेखनामागील प्रेरणा

### ग्रामीण आणि दलित साहित्याची वाटचाल :-

आजपर्यंत दलित साहित्यासंबंधी खूप लिहिले गेले आहे. चर्चाही झालेली आहे. महाराष्ट्रात झालेल्या ग्रामीण व दलित चळवळींची आणि मराठी साहित्यात त्यांची उमटलेली प्रतिबिंबे या संबंधी झालेल्या चर्चाही सर्वपरिचित आहेत. गेल्या शंभर एक वर्षातील या दोन्ही चळवळींचे स्वरूप लक्षात घेतले तर महाराष्ट्रातील "दलित चळवळ" ही "ग्रामीण चळवळ" असू शकते. पण "ग्रामीण चळवळ" ही "दलित चळवळ" असेलच असे मात्र म्हणता येत नाही. कारण ग्रामीण चळवळींचा प्रारंभ आणि केंद्रबिंदू हे बहुधा शहरामध्येच होते. आणि त्याच लोण काही प्रमाणात खेडयांमध्ये दिसत असले तरी त्याचे नेतृत्व आणि सामर्थ्य शहरांमध्येच एकवटलेले होते हे ही तितकेच खरे. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून आजतागायत दलित चळवळीचे निश्चित स्वरूप लक्षात येते. तसे ग्रामीण चळवळीचे निश्चित स्वरूप लक्षात येते नाही. "सत्यशोधक समाजची चळवळ", "ब्राह्मणेतर चळवळ" आणि काही प्रमाणात "सातारा जिल्हयातील प्रतिसरकारची चळवळ" ह्या चळवळी या ग्रामीण चळवळी होत्या. स्वातंत्र्योत्तर काळात अशी संघटीत ग्रामीण चळवळ मात्र दाखविता येत नाही.

दलित चळवळीने आपले उद्दिष्ट, स्वरूप व फलित निश्चितपणे प्रकट केले आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण आणि दलित चळवळींची सुरूवात मात्र महात्मा ज्योतिराव फूले यांच्यापासूनच झालेली आहे. म्हणूनच "ग्रामीण" व "दलित" या चळवळींच्या विचारांचा प्रारंभ महात्मा ज्योतिराव

फूले यांच्यापासूनच करावा लागतो. या संदर्भात बाळकृष्ण कवठेकर हे या दोन्ही चळवळींचे तीन टप्पे मांडतात ते लक्षात घेतले तर "ग्रामीण" व "दलित" चळवळ यांचे नाते व दुरावा कितपत जवळ व लांब आहे हे लक्षात घेता येते. "सत्यशोधक समाजाची चळवळ", "ब्राह्मणेतर चळवळ" आणि "स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण जीवनातील स्थित्यंतरे" हे ग्रामीण चळवळीचे तीन टप्पे मानावे लागतात. तर "आंबेडकरपूर्व काळातील दलित चळवळ", डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ' आणि त्या नंतरच्या काळातील "दलित पँथर" पर्यंतची दलित चळवळ" अशा तीन टप्प्यात दलित चळवळींचा विचार करावा लागतो."[1] एकाच बिंदूपासून चालू झालेल्या या दोन्ही चळवळी काळाच्या प्रवाहात एकमेकांपासून इतक्या दूर गेलेल्या आहेत की – त्यांचा प्रारंभबिंदू आणि अंतिम उद्दिष्ट एकच आहे हे मुद्दाम सांगावे लागते.

स्त्री आणि क्षूद्रादी अतिक्षूद्र यांच्या बाजूने लढणारे महात्मा ज्योतिराव फुले हे सत्यशोधक समाजाचे संस्थापक व न्याय, समता, स्वातंत्र्य आणि विश्वबंधुत्व या तत्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते. द्वेषरहीत ब्राह्मण्यविरोध हा त्यांच्या तत्वज्ञानाचा व त्यांच्या जीवितकार्याचा केंद्रबिंदू होता. पुरोहितशाहीच्या जुलमी वर्चस्वातून दीनदलितांना मुक्त करण्याचे महान कार्य महात्मा फुले यांनी केले. महात्मा फुले यांनी सत्यधर्माचा पुरस्कार करून धर्मभोळेपणा, कर्मकांड, अंध:श्रध्दा, प्रारब्धवाद यांच्यावर हल्ला चढविला. हे करीत असताना त्यांच्या हातून झालेली साहित्यनिर्मिती अधिक मोलाची आहे. तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे वास्तव चित्र महात्मा फुले यांनी लिहिलेल्या उदंड साहित्यातून प्रकट झाले आहे. राजकीय, सामाजिक चळवळी साहित्यनिर्मितीला कशा प्रेरक ठरतात याचे हे बोलके उदाहरण आहे.

उदा. "गुलामगिरी", "शेतकऱ्यांचा आसूड", "ब्राह्मणाचे कसब", "तृतीय रत्न", "अखंड" "सार्वजनिक सत्यधर्म" यामध्ये समाजाच्या प्रत्येक घटकाच्या दुरावस्थेची परखड चित्रे त्यांनी रेखाटलेली आहेत. आजच्या वैज्ञानिक काळात त्यांचे साहित्य वाचताना हृदय पाझरते, अंत:करण भरून येते. समाजातील कष्टकरी बहुजनवर्ग, कामगार वर्ग, स्त्रिया आणि क्षुद्र यांची दुरावस्थेची जाणीव साहित्याच्या माध्यमातून उच्चवर्णियांना करून देऊन ती बदलण्यासाठी झगडण्याची गरज

त्यांनी प्रतिपादन केली. क्षुद्रादी अतिक्षुद्रांच्या जीवनातील सर्व अनर्थांचे मुळ अविद्या हेच आहे हे त्यांनी आवर्जुन सांगितले व शिक्षण प्रसाराची आवश्यकता पटवून दिली. धार्मिक, सामाजिक, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रातील गुलामगिरीवर त्यांनी जोरदार हल्ला चढविला व या सामाजिक लढयात समाजातील सर्व स्तर त्यांनी समाविष्ट करून घेतले. "उच्चवर्णियांच्या अन्यायी वर्चस्वाविरूध्द उभारलेली पण जातियतेचा स्पर्शही नसलेली कनिष्ठ वर्गियांची व्यापक चळवळ"[2] असे महात्मा फुले यांच्या चळवळीचे वर्णन बाळकृष्ण कवठेकर यांनी केलेले आहे ते अगदी योग्यच आहे. येथे मला हेच स्पष्ट करावयाचे आहे की महात्मा फुले यांच्या सामाजिक चळवळीचा पाया व्यापक असून मानवतावादी भूमिकेचा होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या दलित चळवळीचे स्वरूपही हेच होते हे येथे आवर्जुन सांगावे लागेल. महात्मा फुले यांच्या प्रेरणेने उदंड साहित्यनिर्मिती झाली. त्याचप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्याही प्रेरणेतून प्रचंड साहित्यनिर्मिती झाली. सुमारे 1960 पासून जी दलित साहित्य निर्मिती झाली ती उदंड स्वरूपात आहे. हे सर्वश्रूतचे आहे. या साहित्यनिर्मितीच्या उदंड प्रवाहात अनेक दलित साहित्यिक उदयाला आहे व त्यांनी विविध प्रकारचे वाङ्‌मयप्रकार लिहून त्यांनी साहित्यनिर्मितीची उत्कट प्रेरणा व्यक्त केली. आज दलित साहित्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साहित्यप्रकाराचा प्रारंभ सुमारे 1960–65 च्या दरम्यान झाला असे म्हणावे लागते. नव्याने जागृत होत असलेल्या दलित समाजातील 1960 पूर्वीची प्रज्ञावंत माणसे राजकीय, सामाजिक क्षेत्राकडे वळलेली दिसतात आणि 1960 नंतरच्या काळातील हीच प्रज्ञावंत माणसे दलित वाङ्‌मयनिर्मितीकडे वळलेली दिसतात. हे बाळकृष्ण कवठेकरांचे[3] प्रतिपादन दलित वाङ्‌मय इतिहासाला यथार्थपणे लागू पडते.

ज्या काळात "दलित साहित्य" हा शब्दही अस्तित्वात नव्हता तेव्हापासून अण्णा भाऊ साठे हे दलितांच्या जीवन जाणीवा आपल्या विविध वाङ्‌मयप्रकारांमधून वास्तवरूपाने मांडत होते. अण्णाभाऊंच्या समकालीन शंकरराव खरात आणि बाबुराव बागुल ही मंडळी लिहित होती. तरीही दलित कथेचे शिल्पकार म्हणून अण्णाभाऊ साठे यांनाच ओळखले जाते. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात आणि बाबुराव बागुल हे सुरूवातीचे दलित कथाकार. या कथाकारांच्याच कथालेखनाचा

वारसा पुढे दया पवार, माधव कोंडविलकर, अर्जुन डांगळे, योगिराज वाघमारे, योगेंद्र मेश्राम, भिमराव शिरवाळे इत्यादी दलित कथालेखकांनी चालविला.

या दलित कथाकारांप्रमाणेच नाट्यक्षेत्रातही दलित साहित्यिकांनी चांगलीच मजल मारली. अगदी सुरूवातीचे पहिले दलित नाटककार किसन फागुजी बनसोडे यांच्यापासून सुरू झालेली दलित नाटकाची परंपरा प्रभाकर गणविर, गंगाधर पानतावणे, नामदेव व्हटकर, सुरेश बंसारी, प्रा.म.भि. चिटणीस, दत्ता भगत, लक्ष्मण माने, प्रेमानंद गज्वी, रामनाथ चव्हाण यांसारख्या नाटककारांनी अद्यापपर्यंत चालविली आहे.

दलित साहित्याचा ओघ केवळ कथा आणि नाटक ह्या वाङ्.मयप्रकारातच न अडखळता पुढे आत्मकथनांकडे वळला आणि "तराळ–अंतराळ", "बलुतं", "उपरा", "अक्करमाशी", "काटयांवरची पोट", "मुक्काम पोष्ट देवाचं गोटणे" या प्रमुख दलित आत्मकथनांचे लेखक शंकरराव खरात, दया पवार, लक्ष्मण माने, शरणकुमार लिंबाळे, उत्तर बंडू तूपे, माधव कोंडविलकर यांच्यापासून सुरू झालेला दलित आत्मकथनांचा प्रवाह पुढे "घराणं तमासगिराच", "बेरड", "आक्रोश", "उघडा", इथपर्यंतच नव्हे तर अलिकडील "कोल्हाटयाचा पोर" या डॉ.किशोर शांताबाई काळे यांच्यापर्यंत अखंडपणे जोमाने हा वाङ्.मयप्रकार वाहतो आहे.

कथा, नाटक, आत्मकथनाप्रमाणेच दलित कविताही दिवसेंदिवस अधिकच फुलते आहे. अगदी किसन फागुजी बनसोडे यांच्यापासूनते शाहीर वामन कर्डक, शाहीर घेगडे, या सुरूवातीच्या शाहिरी काव्यापासूनते बाळकृष्ण वासनिक, ना.रा.शेंडे, मधु कोकरे, दया पवार, वामन निंबाळकर, ज.वि.पवार, ल.स.रोकडे, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळे, राजा ढाले, अरूण कांबळे, नारायण सूर्वे प्रज्ञा लोखंडे, यशवंत मनोहर यांच्यापर्यंत दलित कवितेने प्रवास केलेला आहे.

दलित कवितेच्याच तोडीची दलित कादंबरीही आपले दलितपण घेऊन वाढते आहे. अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, प्रा.केशव मेश्राम, ना.रा.जाधव, ना.रा.शेंडे,शंकर भाऊ साठे,अनंत घोडे,प्रा.शशिकांत तासगांव या कादंबरीकार मंडळींनी दलित साहित्यातील कादंबरी हा

वाड्.मयप्रकार समृध्द केला आहे. दलित साहित्यात "दलित कादंबरी" हा वाड्.मयप्रकार कमी प्रमाणात असल्याची ओरड करणाऱ्या दलित साहित्याच्या विरोधकांनी केवळ अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे या दोघा साठे बंधूंनी लिहिलेल्या कादंबऱ्याकडे पाहिले तरी विरोधकांची ओरड थांबेल इतक्या प्रचंड प्रमाणात कादंबरी लेखन अण्णाभाऊ व शंकरभाऊ यांनी केले आहे.

<u>अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा अल्प परिचय</u> :-

"चित्रा", "माकडीचा माळ", "संघर्ष", "फकिरा", "वैजयंता", "आवडी" इत्यादी कादंबऱ्या अण्णाभाऊंनी लिहिल्या. "स्टॅलिनग्राडचा पोवाडा", "बंगालची हाक", "पंजाब-दिल्लीचा दंगा", "महाराष्ट्राची परंपरा", यासारखे अनेक पोवाडे लिहिले. "बरबाद्या कंजारी", "चिरागनगरची भूत", "कृष्णाकाठच्या कथा" इत्यादी कथावाड्.मय अण्णा भाऊंनी लिहिले. तर "मुंबईची लावणी", "माझी मैना गावावर राहिली" इ. प्रबोधनपर ठसकेबाज आणि शृंगारिक अशा प्रकारच्या लावण्याही त्यांनी लिहिल्या. केवळ लिहिल्याच नाहीत तर हजारो प्रेक्षकांसमोर आपल्या पहाडी आवाजात गायिल्यासुध्दा. "माझा रशियाचा प्रवास" हे प्रवासवर्णनपर पुस्तक व "इनामदार" हे नाटक ही अण्णाभाऊंची एकमेव वाड्.मयीन कृती होत. असे असले तरी हा वाड्.मयप्रांत अण्णाभाऊ साठे यांनी समर्थपणे हाताळला आहे. "पेंग्याचे लग्न", "पुढारी मिळाला", "अकलेची गोष्ट" या प्रकारची लोकनाट्येही अण्णांनी लिहिली. अण्णाभाऊंची हीवाड्.मयनिर्मिती पाहिल्यानंतर अण्णा हे अष्टपैलू लेखक असल्याची खात्री होते आणि त्यांची दृष्टी ही चौफेर फिरत होती याची प्रचिती येते.

अण्णाभाऊ साठे यांनी कथा, काव्य, नाटक, चित्रपटकथा, लावणी, पोवाडे, लोकनाट्य, प्रवासवर्णन, आणि कादंबरी असे साहित्यातील एकूण सर्वचवाड्.मयप्रकारांमध्ये विपूल प्रमाणात लेखन केले आहे. आपल्या स्वतःच्या साहित्यलेखनाविषयी "फकिरा" कादंबरीच्या प्रस्तावनेत (कैफियत) ते म्हणतात - "ही कादंबरी माझ्या प्रतिभेनं निर्माण केली नाही, प्रतिभेला सत्याचं - जीवनाचं दर्शन नसेल, तर प्रतिभा, अनुभूती वगैरे शब्द निरर्थक आहेत, असा माझा अनुभव आहे. कारण सत्याला जीवनाचा आधार नसला, की प्रतिभा अंधारातील आरशाप्रमाणे निरूपयोगी ठरते. मग

कितीही प्रयत्न करून त्यात प्रतिबिंब दिसत नाही आणि कल्पकता निर्बल होते. अगदी पंखविरहीत पाखराप्रमाणं ती उडूच शकत नाही. मी तरी अशी भरारी मारण्यात भलताच जड आहे. जे पाहिलं, अनुभवलं, ऐकलं तेच मी लिहिले आहे."[4]

अण्णा भाऊ साठे या थोरल्या बंधूकडूनच प्रेरणा घेऊन धाकटे असणारे शंकर भाऊ साठे यांनी आपल्या लेखनाला सुरूवात केली व अजरामर अशा साहित्यकृती लिहिल्या. परंतु दुर्दैवाने अण्णा भाऊं इतकी लोकप्रियता शंकरभाऊंना मात्र मिळाली नाही. दलित कादंबरीचे क्षेत्र या साठे बंधूंनी आपल्या कलाकुसरीने अतिशय चांगल्याप्रकारे सजविले आणि इतर दलित साहित्यिकांपेक्षा आपले वेगळेपण जपले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतरच्या दलित चळवळीचे स्वरूप मात्र महात्मा ज्योतिराव फुले यांच्या नंतरच्या ब्राह्मणेतर चळवळीशी मिळते जुळते असेच आहे. हे ही या निमित्ताने येथे लक्षात येते. महाराष्ट्रातील ग्रामीण आणि दलित चळवळींचा साहित्यनिर्मितीवर परिणाम होऊन "दलित साहित्य" हा एक नवा वाङ्‌मयीन प्रवाह मराठी साहित्याच्या इतिहासात नव्याने उदयाला आला. पुढील साहित्यनिर्मितीच्या वाटचालीत "ग्रामीण साहित्य", "दलित साहित्य" या संबंधीच्या उलट–सुलट प्रतिक्रिया गाजल्या. "दलित साहित्य" हे स्वतंत्र साहित्य की मराठी साहित्यातील एक नवा प्रवाह, हा प्रवाह मानावा की न मानावा असे वाद गाजले. परंतु यासंबंधीच्या चर्चेमध्ये नरहर कुरूंदकर यांनी आपला साहित्य विषयक व्यापक दृष्टिकोन व्यक्त करून साहित्य हे "दलित" असो अगर "ग्रामीण" असो हे सर्व साहित्यच आहे. असे विचार प्रकट करून आली साहित्यविषयक भूमिका स्पष्ट केली आहे.[5]

आजच्या काळात फुले–आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य निर्माण झाले ते विविध वाड.मयप्रकारांनी जोशात आले. त्याचा गौरवही झाला ही गोष्ट स्वागतार्ह आहे.

मराठी साहित्यात काळाच्या ओघात अनेक सामाजिक, आर्थिक, धार्मिक चळवळी उदयाला येऊन त्यांनी साहित्यनिर्मितीला चालना मिळवून दिली आणि चळवळींपासून प्रेरणा घेऊन प्रचंड प्रमाणात साहित्यनिर्मिती झाली.

उदा.वि.स.खांडेकर उर्फ भाऊसाहेब खांडेकर, सानेगुरूजी यांनी गांधीप्रणीत मानवतावादाचे लेखन केले. ना.सि.फडके यांनी प्रेमकथा लिहून कॅालेजातील तरूणांची गुलाबी दुनिया कादंबरी वाड्.मयाद्वारे उभी केली. खांडेकर, सानेगुरूजी यांनी देशभक्त प्रियकर चित्रित केले. तर नरहर कुरूंदकरांनी राष्ट्रीय स्वातंत्र्याची आंदोलने ग्रामीण साहित्यातून स्पष्ट झाल्याचे दाखवून दिले. गांधीजींच्या राजकारणामुळे "खेडयाकडे चला" असा गजर सुरू झाला होता व त्यामुळे खेडी म्हणजे दणकट शरीर, मोकळा वारा, दुध, तूप, ताजे अन्न यांचा सुकाळ, मोकळा निसर्ग आणि रासवट भावना असे खेडयाचे चित्र उभे राहिलेले होते. जीवनाची चांगली बाजू ग्रामीण साहित्यात मांडली गेली आणि ग्रामीण जीवनाचा भकास उध्वस्तपणा आणि माणसांचे खुरटे क्षुद्र व्यक्तिमत्व उपेक्षित राहिले. शहरी वातावरणातील एकसूरी भकास कंटाळवाणेपणापासून सुटका करून घेणे असा ग्रामीण कादंबरीचा हेतू होता.

उदा : "पानकळा", "सराई", "मिठभाकर", "रेशमाच्या गाठी" आदि कादंबऱ्यांचा या दरम्यान उदय झाला. गांधीजींच्या कॅांग्रेस प्रणीत राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीला समांतर असा 1934 सालानंतर समाजवादी व साम्यवादी पक्ष उदयाला आला. डाव्या चळवळींच्या संपर्कात येऊन टिटवाळच्या किसान सभेच्या अधिवेशनात शाहीर अमर शेख आणि शाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपले शाहीरी डफ वाजविले आणि यातून शेतकरी, कष्टकरी, कामगार यांच्या वर्गिय जीवनाचे चित्रण करणाऱ्या काव्यनिर्मितीला पेव फूटले व त्यांच्या कवनांतून मार्क्सवादी दृष्टिकोन व्यक्त होऊ लागला आणि डाव्या चळवळीचे परिणाम व्यक्त होऊ लागले. डाव्या चळवळीचे विघटन आणि ओहोटी यांचा वेध घेऊन अण्णा भाऊ साठे हे कादंबरी लेखनाकडे वळले व त्यांची "फकिरा" ही कादंबरी खूपच गाजली. 1920 च्या दरम्यानच्या समाजस्थितिचे, जाती व्यवस्थेचे वास्तवदर्शन या कादंबरीतून अण्णा भाऊ साठे यांनी घडविले. अण्णाभाऊंनी माकडवाला, पारधी, रामोशी, वंजारी, कुणबी, मांग, महार, चांभार अशा गावकुसा बाहेरच्या उपेक्षित भटक्या विमुक्त जाती–जमाती मराठी साहित्याच्या विश्वात प्रथम आणून सोडल्या. शंकर भाऊ साठे यांनीही आपल्या साहित्य लेखनाचे योगदान यामध्ये हिरीरीने मिसळून टाकले.

अण्णा भाऊंनी इ.स.1942 पासून आपल्या साहित्य लेखनाला सुरूवात करून इ.स. 1969 पर्यंत प्रचंड अशी साहित्यनिर्मिती करून मराठी साहित्यात आपले स्थान उंचावर नेऊन ठेवले. पोवाडे, लावण्या, किसान गीते, मजूर गीते, छक्कड, गण, पदे, लोकनाट्य, कथा, काव्य, नाटक, प्रवासवर्णन, कादंबरी असे साहित्याचे सर्व प्रकार आपलेसे केले आणि "अक्षरशत्रू" असणारे अण्णाभाऊ साठे हे खरोखरच "अक्षरप्रभू" झाले. साहित्याचा इतका मोठा लेखनप्रपंच उभारून गावकुसाबाहेरच्या दलित साहित्याचे "अनभिशिक्त सम्राट" बनले. अण्णा भाऊ साठे यांना सातासमुद्रापार लोकप्रियता मिळाली. सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यातील वाटेगावचे अण्णाभाऊ आपल्या प्रतिभाशक्तीच्या जोरावर प्रचंड अशी साहित्यनिर्मिती करून रशियातील मास्कोपर्यंत जाऊन पोहचले. पुढे अण्णाभाऊ साठेंचाच वारसा त्यांच्या पाठच्या धाकटया बंधूनी शंकर भाऊ साठे यांनी अण्णाभाऊंच्या पश्चात आयुष्यभर चालविला. योगायोग म्हणजे ज्या पेनने स्वत: अण्णाभाऊंनी अनेक कथा, कादंबऱ्या लिहिल्या होत्या तोच पेन मृत्यूपूर्वी अण्णाभाऊंनी 1968 साली आपल्या भावाला शंकर भाऊंना दिला व शंकर भाऊंना अण्णा भाऊ साठे म्हणाले – "शंकर, हा माझा पेन सांभाळून ठेव, याने मी पुष्कळ लिहिले आहे. हा कुणाला देऊ नकोस. म्हणाले माझ्याकडे आणखी दोन तीन चांगले पेन आहेत. तेव्हा याला जपून ठेव."[6] आणि शंकर भाऊंनीही तो पेन जपून ठेवलेला होता. पुढे दि.18 जुलै 1969 रोजी अण्णा भाऊ साठे यांचा मृत्यू झाला आणि अण्णा भाऊंच्या पश्चात शंकर भाऊंनी त्याच पेनने "माझा भाऊ अण्णाभाऊ" आणि "एकच काडतूस" हे आपले लेखन लिहून साहित्य लिखाणला सुरूवात केली.

अशाप्रकारे अण्णा भाऊ साठे जेव्हा लिहित होते तेव्हा 1945 नंतर नवकथेचे युग अवतरले होते. गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर ही मातब्बर लेखक मंडळी शहरी पांढरपेशा ब्राह्मण समाजाच्या जीवनावर व खेडयातील भट–भिक्षूक समाजाच्या जीवनावर त्यांचे गुणगान करणारे लेखन करत होते.

उदा. : व्यंकटेश माडगूळकरांची "बनगरवाडी" ही कादंबरी आणि हिच्या समान इतर वाड्.मयीन साहित्यकृती, ब्राह्मणी मध्यमवर्गीयांनी या सर्व पांढरपेशा वर्गाचे साहित्य डोक्यावर घेऊन

गौरविले. ब्राह्मणी लेखक व ब्राह्मणी रसिक या दोघांकडूनही दलित लेखक उपेक्षित राहिले. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य डोक्यावर घेऊन नाचण्यासारखे असतानासुध्दा त्यावेळी अण्णाभाऊ उपेक्षित आणि अंधारातच राहिले असे दुर्दैवाने म्हणावे लागते.

अण्णाभाऊ साठे यांनी वर्गिय दृष्टिकोन डोळयासमोर ठेऊन श्रमिक, कष्टकरी, कामगारांच्या बाजूने सहानुभूतीपूर्वक लिहिले आणि शेटजी-भटजी यांसारख्या भांडवलदार वर्गाला त्यांनी आपल्या साहित्याद्वारे धारेवर धरल्याचे दिसते. अण्णाभाऊ, शंकरभाऊ या साठे बंधूंच्या घराण्याला कोणत्याही प्रकारचा शैक्षणिक वारसा नसतानासुध्दा आणि या बंधूंनी कोणत्याही विद्यापीठाची पायरी न चढता देखिल अशी काही साहित्यनिर्मिती केली की त्या साहित्यकृतींचा विद्यापिठीय अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला. वेळप्रसंगी वाट्टेल ते करून जगणारे व समाजालाही जगवणारे, गावाच्या भल्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या "फकिरा", "राणोजी", "सावळा" यांसारखे नायक अण्णाभाऊंनी उभे केले. तर सौंदर्यासोबतच शिलाचीही जपणूक करणाऱ्या, आब्रुसाठी जीव देणाऱ्या आणि आपल्यावरील अन्यायाला जाब विचारून बदला घेणाऱ्या स्त्री नायिकांना अण्णाभाऊंनी आपल्या कथा, कादंबऱ्यांचा विषय बनविल्या. म्हणूनच अण्णाभाऊंचे साहित्य अनेक भाषांमध्ये रूपांतरीत झाले. अण्णाभाऊंच्या जीवनवाङ्‌मयाची इंग्रजी भाषिकांना ओळख व्हावी म्हणून प्रा.बजरंग कोरडे यांनी नुकताच प्रकाशित केलेला अण्णाभाऊ साठे (इंग्रजी) हा ग्रंथ या संदर्भात उल्लेखनीय वाटतो.[7] अण्णाभाऊंनी आपल्या लेखनसाहित्याविषयीची प्रेरणास्थाने आणि लेखनहेतू हे आपल्या अनेक कादंबऱ्यांच्या प्रस्तावनेतून व्यक्त केलेले आहेत. महाराष्ट्र शासनाने सर्वोत्कृष्ट कादंबरी म्हणून गौरविलेली "फकिरा" ही कादंबरी लिहिण्या पाठीमागची भूमिका विषद करताना फकिराच्या प्रस्तावनेत (कैफियत) अण्णाभाऊ म्हणतात - "मी पहिली घुटी इंग्रजी खजिन्यातील लुटीच्या पैशांचीच खाल्ली होती, मग आक्कानं, आप्पानं, त्या गावानं, माळानं नि खोऱ्यानं मला जे सांगितलं, ते हृदयात साठवून गप्प बसलो होतो. त्यानं माझ्यावर उपकार केला होता. त्याच्या पैशांची मी घुटी गिळली होती. सुरती रूपयांच्या दोन ओंजळी माझ्यावर उधळून तो गेला होता. त्याला मी कसा विसरणार ? सरकारी खजिना लुटून केलेले उपकार कसे फेडावेत,

याचा मी विचार करीत होतो. अखेर ज्ञानेशाची, तुक्याची, तीन कोटी मराठी जनतेची जी मराठी भाषा, तिचं भांडार लुटून, "फकिरा" वर उधळून त्या दोन ओंजळींची फेड करण्याचा मी प्रयत्न केला आहे."[8] अण्णाभाऊंच्या साहित्यातील पात्रे ही विशेषकरून अण्णाभाऊंचीच माणसं असतात आणि त्यामुळे त्यांची मुर्वत ठेऊनच ते लिहित असतात याची वरील विवेचनावरून खात्री पटते.

सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यातील वाटेगावी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मांग समाजात अण्णांचा जन्म झाला. शाळेतील शिक्षक ब्राम्हण समाजाचे असल्याने व अण्णाभाऊ मातंग समाजाचे असल्याने अण्णा फक्त दीड दिवसच शाळा शिकले. पुढे धाकटे बंधू शंकरभाऊ यांना कधी खांद्यावर घेऊन तर कधी बोटाला धरून चालवत अण्णाभाऊ-शंकरभाऊ हे भाऊ-भाऊ मुंबईला पोहचले. अण्णांना मुंबईतील वरळी परिसरात राहणारा "ज्ञानूबुवा" हा चुलतभाऊ भेटतो व तोच अण्णांचा गुरू बनतो. अण्णांना ज्ञानूकडून अक्षरओळख होते व निरक्षर अण्णा साक्षर होतात. समाजाच्या शाळेतील धडे गिरवत गिरणी कामगार बनतात. संप, मोर्चे, सभा, बैठका याद्वाने कामगार असलेल्या अण्पांच्या संवेदनशील मनावर कम्युनिस्ट विचारांचे संस्कार होतात. आणि साक्षर बनलेले अण्णाभाऊ अक्षरवाङ्मय लिहू लागतात. अण्पांच्या जीवनाच्या पूर्वार्धात मार्क्सवादाचा प्रभाव जाणवतो तर त्यांच्या उत्तरार्धातील जीवनात, साहित्यात आंबेडकरवाद दिसून येतो. म्हणजे अण्णाभाऊंच्या ठिकाणी मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद यांचा सुरेख संगम झालेला होता हे येथे स्पष्ट होते. शंकरभाऊंच्याही मनावर कम्युनिस्ट आणि महात्मा फुले - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे संस्कार झाल्याचे दिसून येते. अण्णाभाऊ - शंकरभाऊ एकाच कुटुंबात, एका आईच्या पोटी जन्माला आले, आयुष्यभर दोघे भाऊ एकाच तत्वप्रणालीने जीवन जगले आणि एकाच उद्देशाने दोघांनीही आपले साहित्यलेखन केल्याचे दोघांच्या चरित्र वाङ्मयाच्या वाचनावरून लक्षात येते.

**शंकरभाऊ साठे यांचा साहित्यप्रपंच :-**

साहित्यलेखन निर्मितीच्या प्रेरणेविषयी व आपल्या साहित्याविषयी शंकरभाऊ त्यांच्या "लखू" या कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात – "धाडसी झुंजार माणसं अंधारात राहू नयेत म्हणून अण्णाभाऊंनी राणोजी., "फकिरा", "सावळा" ही अन्यायाविरूध्द बंड करणारी मातंग समाजाची माणसं महाराष्ट्राला दाखवून दिली. एकच काडतूसचा "दौलती", घमेंडखोर "घमांडी" ही सुध्दा याच समाजाची होती. यांना अंधारातून उजेडात आणण्याचे काम आम्ही केले आहे. कारण ही माणसं आमची होती. ती सत्यासाठी लढणारी होती, अन्याय त्यांना सहन होत नव्हता म्हणून ती माणसं कादंबरीरूपानं वाचक वर्गापर्यंत पोहचावीत म्हणून मी हा "लखू" लिहिला आहे."[9] शंकर भाऊ साठे यांनी "सावळा", "घमांडी", "बाजी", "हंबीरा", "लखू" यांसारखे नायक मराठी भाषिकांना दाखवून दिले. त्याचप्रमाणे "सगुणा", "सुगंधा", "बायडी" यासारख्या स्त्री नायिकाही कादंबरी रूपाने अजरामर केल्या. सर्वसामान्य असूनही प्रतिभेच्या बळावर शंकर भाऊ साठे हे कसे असामान्य साहित्यिक बनले हे त्यांचा साहित्यप्रपंच पाहून लक्षात येते.

तात्पर्य – थोरले अण्णाभाऊ आणि धाकटे शंकरभाऊ हे साठेबंधू साहित्यनिर्मितीच्या क्षितिजावर आपआपल्या तेजाने तळपले हेच खरे. दोघांत लेखन साहित्यांच्या वैशिष्टयांचे कमालीचे साम्य आढळत असले तरी दोघांनीही आपले स्वतंत्र अस्तित्व मराठी रसिकांच्या, वाचकांच्या मनावर अजरामर असे बिंबवले आहे यात शंका नाही.

साहित्य आणि समाजीवन यांचा अतूट असा संबंध असतो. जे जीवनामध्ये असते तेच साहित्यात दिसते. व जे साहित्यात आहे तेच जीवनात कोठेतरी आढळते याचे प्रत्यंतर या साठेबंधूंचे साहित्य वाचताना येते. साहित्याने समाजजीवनाशी फटकून वागू नये म्हणूनच साहित्य आणि समाजजीवन यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करण्याचा मी दुसऱ्या प्रकरणात प्रयत्न केला आहे. हा संबंध स्पष्ट करून शंकर भाऊ साठे यांच्या साहित्यातील वास्तवता मी स्पष्ट केली आहे व साहित्य आणि समाजीवनाचा संबंध कसा अतूट असतो ते मी उदाहरणासह पुढील प्रकरणात स्पष्ट केले आहे.

## संदर्भ सूची


1. बाळकृष्ण कवठेकर, "प्रतिसाद", मेहता पब्लिशिंग, प्रथमावृत्ती, मार्च 1986, पृष्ठ क्र.12.
2. तत्रैव, पृष्ठ क्र.13.
3. तत्रैव, पृष्ठ क्र.29
4. अण्णा भाऊ साठे, "फकिरा", सुरेश एजन्सीज–पुणे, अठरावी आवृत्ती, एप्रिल–1998, कैफियत.
5. बाळकृष्ण कवठेकर, "प्रतिसाद", मेहता पब्लिशिंग, प्रथमावृत्ती, मार्च 1985, पृष्ठ क्र.57.
6. शंकर भाऊ साठे, "माझा भाऊ अण्णा भाऊ", विद्यार्थी प्रकाशन, पुणे – 9, तिसरी आवृत्ती, एप्रिल–1990, "आत्मकथन".
7. प्रा.रा.ग.जाधव, दै."सकाळ", पुणे, "पुस्तकपरिचय" – सातारा आवृत्ती – रविवार दि.16 मे 1999, पृष्ठ क्रं.10.
8. अण्णा भाऊ साठे, "फकिरा", सुरेश एजन्सीज, पुणे, अठरावी आवृत्ती, एप्रिल – 1998, पृष्ठ. "कैफियत".
9. शंकर भाऊ साठे, "लखू", विद्यार्थी प्रकाशन, पुणे – 9, प्रथमावृत्ती – जानेवारी 1987, पृष्ठ क्रं. "थोडक्यात दोन शब्द".